**ISSN: 2278-4632**
**Vol-10 Issue-6 No. 16 June 2020**

# सरदार वल्लभभाई पटेल यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान

**डॉ. तानाजी ज. फुलारी**
इतिहास विभागप्रमुख
विज्ञान महाविद्यालय, सांगोला. ता. सांगोला, जि. सोलापूर

**सारांश–**
इतिहास म्हणजे थोर व्यक्तीचे चरित्र होय असे मत एका नामवंत इतिहासकाराने म्हंटले आहे. ज्या थोर व्यक्ती आपल्या विचार व कृतीतून समाजावर प्रभाव पाडतात व तत्कालीन काळावर आपल्या कार्यात्मक प्रभावातून अधिराज्य गाजवतात अशा व्यक्तीची नोंद इतिहास घेत असतो. अशाच थोर पुरुषामध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांचा समावेश होतो. प्रस्तुत संशोधन लेख सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवन परीचयापासून ते देशाच्या एकीकरणाच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीसाठी देवू केलेल्या योगादानापर्यंतची माहिती देणारा संक्षिप्त लेख आहे.

**शब्दसूची** – सरदार वल्लभभाई पटेल, चळवळीचा इतिहास, आदर्श व दिशा

**प्रस्तावना –**

भारतीय स्वातंर्त्य चळवळीचा इतिहास हा दैदिप्यमान असून तो अधिक प्रखरपणे व अविरतपणे चालविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य विविध महापुरुषानी केलेले आहे. थोमस कार्लाईल यांच्या मते "इतिहास म्हणजे थोर व्यक्तीचे चरित्र अभ्यासणे होय." इतिहास हा महान व्यक्तीच्या कार्याचा आढावा घेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतो कारण महान व्यक्तीच्या कार्य हे वर्तमानात वावरणाऱ्या समाजघटकांना आदर्श व दिशा देण्याचे कार्य करते. सदर संशोधन पत्रिकेत भारताच्या अखंडत्वासाठी सतत परिश्रम करणारे, स्वातंर्त्य भारताचे पहिले गृहमंत्री, पहिले उपपंतप्रधान, एकसंघ भारत ज्यांच्या प्रयत्नाने व प्रत्यक्ष कृतीतून उभा राहिला असे थोर व्यक्तिमत्त्व म्हणजे वल्लभभाई पटेल यांच्या बहुआयामी पैलूवर प्रकाश टाकण्याच्या हेतूने सदर विषय निवडण्यात आला.

**उद्देश –**

१. सरदार वल्लभभाई पटेल यांची ऐतिहासिक कार्यात्मक ओळख करणे.
२. सरदार पटेल यांचे देश उभारणीसाठीचे योगदाग स्पष्ट करणे.
३. सरदार पटेल यांचे विविध क्षेत्रातील कार्य आणि विचार यांचा आढावा घेणे.

**जीवन परिचय–**

सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म गुजरात मधील खेडा जिल्ह्यतील नाडियाड येथे ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी एका शेतकरी कुटुंबात झाला. आनंद हे त्यांचे गाव. जवळच असलेल्या करमसाद या गावी त्यांची वडिलार्जित शेती होती. त्यांच्या वडीलांचे नाव झव्हेरीभाई हे होते. भारतीय स्वातंर्त्य चळवळीचा प्रभाव त्यांच्या कुटुंबावर अगोदर पासूनच झालेला होता. त्यांच्या वडिलांनी १८५७ च्या स्वातंर्त्ययुद्धात भाग घेतला होता. त्यामुळे सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावर घरीच राजकीय संस्काराची शिदोरी मिळाली होती. झाले होते. पटेल यांनी आपले वकिलीचे शिक्षण परदेशातून पूर्ण करून भारतामध्ये आल्यानंतर बोरसाड येथे वकिली सुरू केली. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून वल्लभभाईनी आपले बॅरिस्टर पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

 **Copyright © 2020 Authors**

ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-6 No. 16 June 2020

पुढे त्यांनी सन १९१३ अहमदाबाद येथे वकिली सुरू केली. एक निष्णात वकील म्हणून त्यांचा अल्पावधीतच लौकिक झाला. वकिलीबरोबरच त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली. तिथूनच पुढे त्यांचा भारतीय राजकारणात प्रवेश झाला.

**खेडा आंदोलन आंदोलन आणि सरदार पटेल –**

१९१७ मध्ये खेडा जिल्ह्यावर नैसर्गिक आपत्ती आल्यामुळे खरीपाचे व रब्बी पिकाचेही अत्यंत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्याचबरोबर उपलब्ध पिकावर अनैसर्गिक असंतुलिक निसर्ग चक्रामुळे पिकावर कीटकांचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्याच्या पिकांचे अत्यंत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. शेतकऱ्याच्या शेतीचे नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानामुळे नियोजित येणाऱ्या उत्पादनापेक्षा अत्यंत कमी उत्पादन होण्याची भीती निर्माण झाली. नैसर्गिक दुष्काळामुळे शेतीच्या उत्पादनावर झालेला परिणाम यामुळे ब्रिटीश सरकारने ठरवून दिलेला शेतसारा खेडा जिल्ह्यातील शेतकरी भरण्यास असमर्थ होते त्यामुळे शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलण्याच्या हेतूने ब्रिटीश सरकारला एकत्रित मागणी केली व त्यासाठी शेतकऱ्यांच्या १८ हजार सह्या असलेले एक निवेदन १५ नोव्हेंबर दयालाल येथील होमरूल लीगच्या सभासदाच्या माध्यमातून १९१७ रोजी सरकारला देण्यात आले. परंतु सदर निवेदनास ब्रिटीश सरकारने केराची टोपली दाखविली व समस्याचे निराकरण करण्याऐवजी इंग्रज सरकारने शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश काढले आणि भांडीकुंडी जप्त करून सारावसुली सुरू केली. काही शेतकऱ्यांनी जमिनीचा काही हिस्सा विकून तर काहींनी व्याजाने रक्कम काढून शेतसारा भरला. या अन्यायात शेतकरी भरडला जाऊ लागला.

महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसाऱ्याच्या वसुली विरोधात खेडा जिल्ह्यतील हजारो शेतकऱ्यांची सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपविले. सरदार पटेल यांनी ६०० गावांतील हजारो सत्याग्रही शेतकऱ्यांचे आंदोलन अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. यातूनच सरदार पटेल यांचे नेतृत्व भारतीय स्वातंर्त्य चळवळीत उदयास आले आणि महात्मा गांधींच्या सहवासात ते वाढलेदृ फुलले आणि एक कणखर, धाडसी नेता म्हणून लौकिकप्राप्त झाले

**संस्थाने विलीनीकरण आणि सरदार वल्लभभाई पटेल –**

१५ ऑगष्ट, १९४७ मध्ये भारताला स्वातंर्त्य मिळाले. स्वातंर्त्य भारताचा राज्यकाभार भारतीयांच्या माध्यमातून चालविला जाण्याच्या हेतूने निर्वाचित मंत्रीमंडळाची स्थापना करण्यात आली. त्यान्वये स्वतंत्र भारताचा राज्य कारभार पाहण्यासाठी पंतप्रधान पं. नेहरू यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ अधिकारावर आले. या मंत्रिमंडळात सरदार वल्लभभाई पटेल उपपंतप्रधान झाले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती व नभोवाणी खाते, संस्थानांचा प्रश्न व निर्वासितांचे पुनर्वसन इ. खात्यांची जबाबदारी होती. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थानांचे स्वतंत्र भारतात विलीनीकरण करून एकसंध भारत निर्माण केला. सरदार पटेल यांची ही मोठी ऐतिहासिक कामगिरी आहे. त्यांच्या या कामगिरीने सरदार पटेल खऱ्या अर्थाने पोलादी पुरुष आहेत हे इतिहास सिद्ध झाले.

इंग्लंडचे माजी पंतप्रधान चर्चिल हे भारतद्वेषी होते. भारताच्या विरुद्ध कटदृकारस्थानं करण्यात इंग्लंडच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये चर्चिल आघाडीवर होते. भारतातील ५६५ संस्थानांचं स्वतंत्र राज्य असावं अशी चर्चिल यांची योजना होती. त्यांची ही योजना पटेल यांना अस्वस्थ करीत होती.चर्चिल यांच्या योजनेनुसार कॅबिनेट मिशनने १२ मे आणि १६ मे १९४६ रोजी दोन महत्त्वाच्या घोषणा केल्या. पहिल्या घोषणेनुसार जेव्हा ब्रिटिश भारतात एक किंवा दोन सरकारं अस्तित्वात येतील तेव्हा राजसत्तेचा संस्थानांवरचा अधिकार आपोआपच संपेल. या राज्यांनी मांडलिकत्व स्वीकारताना ब्रिटिश राजसत्तेला दिलेले अधिकार त्यांना परत

 Copyright © 2020 Authors

ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-6 No. 16 June 2020

दिले जातील. ही राज्यं नंतर नव्या सरकारबरोबर संघराज्यात सामील होतील किंवा स्वतंत्र राजकीय व्यवस्था निर्माण करतील. यामुळं हे राजे एका रात्रीत स्वतंत्र राजे होतीलय ही स्थिती अतिशय धोकादायक आहे हे पटेलांनी तात्काळ ओळखले. १६ मे १९४६ रोजी ब्रिटिशांनी पत्रक काढून या संस्थानांच्या सार्वभौमत्वावर जवळपास शिक्कामोर्तब केलं. या राज्यांचं स्वामित्व ब्रिटिश राजसत्ता स्वतरूकडे ठेवणार नाही आणि नव्या सरकारकडे ते देणार नाही, असं या पत्रकात म्हंटल होतं. याप्रमाणे चर्चिल यांना भारतातील ५६५ संस्थानांचं 'प्रिन्सेस स्थान' करायचं होतं म्हणजे चर्चिल यांना जाता जाता भारताचे अधिकाधिक तुकडे करून भारत दुबळा करायचा होता. पोलिटिकल डिपार्टमेंटचे सचिव कॉनराड कोरफिल्ड यांनी २६ मार्च १९४७ रोजी माऊंटबॅटन यांच्या स्टाफ मिटिंग वेळी सांगितलं की, भारतीय संघराज्यात काही संस्थानांनी सामील व्हायचं नाही असा कट रचला होता. आणि या कटाला आपला पाठिंबा होता. अशा संस्थानिकांची एक तिसरी शक्ती उभी करण्याचा आपण प्रयत्न करीत होतो. चर्चिल यांच्या कल्पनेतील 'प्रिन्सेसस्तान' ते हेच होतं. संस्थानांच्या विलिनीकरणात सरदार पटेल यांनी जी कणखरता दाखवली तिचं महत्त्व या पाश्वर्भूमी लक्षात येते.

सरदार वल्लभभाई पटेल यांना देशाच्या स्वातंर्त्य चळवळीच्या इतिहासात 'पोलादी पुरुष' म्हणून अत्यंत आदराने गौरविले गेले आहे. महात्मा गांधी यांच्या जवळचे सहकारी म्हणून सरदार पटेल स्वातंर्त्य चळवळीत अग्रेसर होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व वैशिष्टयपूर्ण होते. चाणक्याची मुत्सद्दी नीती त्यांच्याजवळ होती. आपल्या कामावर त्यांची प्रचंड निष्ठा होती. त्यांच्याकडे उत्तम संघटनकौशल्य होते. ते खंबीर प्रशासक होते. कणखर धोरणांचा अवलंब करून ५६५ संस्थानांचे विलीनीकरण त्यांनी करून एकसंध भारत उभा केला.

**भारताचे प्रथम गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल —**

भारताचा राज्यकारभार पाहण्याकरिता काँग्रेस, मुस्लीम लीग या अन्य पक्षांशी चर्चा करून इंग्रज सरकारने हंगामी सरकार सप्टेंबर १९४६ साली नियुक्त केले. या सरकारमध्ये सरदार वल्लभभाई पटेल गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारतदृपाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. त्यानंतर हिंदूदृमुस्लीम यांच्यात उसळलेल्या प्रचंड जातीय दंगलीमध्ये कणखर भूमिका घेऊन त्यांनी जातीय दंगली आटोक्यात आणण्याचे अथक प्रयत्न केले. पाकिस्तानच्या आगळिकीविरुद्ध जोरदार इशारा दिला. हिंदू आणि मुस्लीम यांच्याशी व्यवहारवादी भूमिकेतून संवाद साधून शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पटेल यांच्या बोलण्यात आणि कृतीत धर्मनिरपेक्षता होती.

२ सप्टेंबर १९४६ ते १५ डिसेंबर १९५० या काळात सरदार पटेल गृहमंत्री होते. पंतप्रधान पं.नेहरू आणि सरदार पटेल यांच्यात तीव्र मतभेद होते. हे मतभेद प्रबळ व्यक्तित्ववाद, दृष्टिकोन आणि कार्यपद्धती यांतील फरक यामुळे होते.

गांधी, पटेल आणि नेहरू यांच्यात कितीही मतभेद असले तरी या तिघांचे राष्ट्रहिताचे विचार परस्परांना पूरक होते. गांधींनी लाखो लोकांना प्रेरणा दिली. पटेलांनी या लाखो लोकांना संघटित केलं. एक लढाऊ शक्ती उभी केली. हे तिघंही अत्युच्च ताकदीचे नेते होते. तिघांमध्येही प्रचंड ऊर्जा होती. तिघांनीही देशासाठी मोठा त्याग केला. सरदार पटेल नेहरूंबरोबर स्वातंर्त्यसंग्रामात ३० वर्षे खांद्याला खांदा लावून इंग्रजांविरुद्ध लढले होते. आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात त्यांना सोडून जाणे पटेल यांच्या मनाला योग्य वाटत नव्हतं. राजकीय मतभेद असले तरी नेहरूंवर त्यांचं धाकटया भावांसारखं प्रेम होतं. पटेल यांनी आपल्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रात आपलं मन मोकळं केलं आहे. ते म्हणतात, कोणत्याही दोन प्रामाणिक सहकार्‍यांत असतात तसे आमच्यात वैचारिक मतभेद आहेत. पण आम्ही परस्परांच्या विरोधात आहोत असा त्याचा अर्थ होत नाही. सरदार पटेल मनाने कणखर आणि विचारांचे पक्के होते. सच्चे होते. त्यामुळेच नेहरूंबरोबरच काय, पण गांधीजींबरोबरचे मतभेद व्यक्त करायलाही ते कचरत नसत.


www.junikhyat.com
Copyright © 2020 Authors

ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-6 No. 16 June 2020

सरदार पटेल यांना मंत्रिमंडळात घेताना नेहरूंनी त्यांना एक पत्र लिहिलं होतं. ते या पत्रात म्हणतात, ''तुम्हाला मी केवळ औपचारिकता म्हणून हे पत्र पाठवीत आहे. खरं तर माझ्या मंत्रिमंडळाचा तुम्हीच सर्वात भक्कम आधार आहात. या पत्राला पटेल यांनी नम्रपणे नेहरूंना पत्र पाठवून उत्तर दिले. या पत्रात सरदार पटेल म्हणतात, ''गेल्या ३० वर्षांतील आपली मैत्री आणि आपण एकत्रितपणे केलेलं कार्य पाहता आपल्यात कुठलीही औपचारिकता असूच शकत नाही. तुम्ही देशासाठी एवढा त्याग केलाय की, तुमच्यावरील माझं प्रेम आणि निष्ठा अखेपर्यंत कायम आणि वादातीत राहील. तुमच्यासाठी मी कायम उपलब्ध आहे. आपलं ऐक्य अभंग राहील आणि तीच सर्वात मोठी शक्ती आहे.''

अलीकडील काही वर्षांपासून भारतीय जनता पक्ष हा सरदार पटेल यांच्यावर स्तुतीसुमनं उधळू लागलेला आहे. पं. नेहरूंपेक्षा पटेल हे कसे श्रेष्ठ होते हे भाजप सांगत आहे. सरदार पटेल यांना भाजपच योग्य न्याय देणार आहे असे आवर्जून सांगितले जाते. वास्तविक महात्मा गांधी असोत की पं. नेहरू, सरदार पटेल असोत की नेताजी सुभाषचंद्र बोस, मौलाना आझाद असोत की असंख्य ज्ञातदृअज्ञात नेतेदृ कार्यकर्ते असोत, या अनेकांनी देशासाठी मोठा त्याग केला आहे.त्यांच्या मरणोत्तर या नेत्यांपैकी कोणता नेता श्रेष्ठ असा वाद निर्माण करणे देशाच्या ऐक्याच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे. हे सर्वच राजकीय पक्षांनी आणि त्यांच्या नेत्यांनी गांभीर्याने विचारात घेणे आवश्यक आहे.

**सरदार पटेल यांचे राजकीय योगदान –**

भारतीय स्वातंर्त्यालढ्यात आणि त्यानंतरच्या स्वातंर्त्योत्तर भारतात वल्लभभाईंना मानाचे स्थान आहे. एकात्म भारताचे ते खरे शिल्पकार असून काँग्रेसच्या पक्ष संघटनात्मक कार्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. भारताचा पोलादी पुरुष म्हणून त्यांची जगभर ख्याती होती. ते धार्मिक व परंपरागत विचारसरणीचे होते आणि वृत्तीने अत्यंत कणखर होते. ते स्वतःला एक सामान्य शेतकरी व काँग्रेसचा एक नम्र सैनिक म्हणत. शेतकर्‍यांत स्वाभिमान निर्माण झाला, यात आपण कृतार्थ झालो असे ते मानीत. साधी राहणी, उच्च विचारसरणी आणि तत्काळ कृती यांवर त्यांचा भर असे. जवाहरलाल नेहरूंचा सामाजवादी आदर्शवाद त्यांना मान्य नव्हता. ते पूर्णतः वास्तववादी होते. त्यांचे व नेहरूंचे अनेक तात्त्विक मतभेद होतेय पण महात्मा गांधी या दुव्यामुळे ते एकच काम करीत. शिवाय दोघांना व्यक्तिगत मतभेदांपेक्षा देशाचे कल्याण व भवितव्य श्रेष्ठ वाटे.

महात्मा गांधी गुजरात सभेचे अध्यक्ष व वल्लभभाई चिटणीस झाले. त्यांनी १९१७–१८ सालच्या खेडा सत्याग्रहात हिरिरीने भाग घेतला आणि तो यशस्वी करून दाखविला. अहमदाबाद नगरपारिकेत ते याच वर्षी निवडून आले. पुढे तर १९२४–२८ दरम्यान ते नगरपालिकेचे अध्यक्ष झाले. त्यांनी अनेक सुधारणा करून अहमदाबाद शहर स्वच्छ व सुंदर केले. त्यांनी केलेल्या सुधारणांत जलनिकास व्यवस्था व पाणीपुरवठा योजना या दोन महत्त्वाच्या होत. त्या वेळी गुजरातमध्ये वेठबिगार पद्धती होती. त्यांनी प्रयत्न करून ती पद्धत बरीच मर्यादित केली. रौलट कायद्याचे वेळी त्यांनी आक्षिप्त राष्ट्रीय साहित्य विकले व सार्वजनिक निदर्शनांत भाग घेतला. गांधींच्या असहकारितेत्या चळवळीत वल्लभभाई आघाडीवर होते. त्यांनी सुखासीन राहणीमानाचा त्याग केला व तत्काल वकिली सोडली. या सुमारास दहा लाखांचा निधी गोळा करून गुजरात विद्यापीठाची स्थापना केली. १९२१ साली ते गुजरात प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष झाले आणि लवकरच अहमदाबाद काँग्रेस अधिवेशनाचे ते स्वागताध्यक्ष बनले. १९२३ सालच्या नागपूर झेंडा सत्याग्रहात त्यांच्याकडे नेतृत्व होते. त्यांनी तो सत्याग्रह यशस्वी केला. याच सालच्या बोरसद सत्याग्रहातही ते यशस्वी झाले. १९२७ साली ते नगरपारिकेचे अध्यक्ष असताना गुजरातमध्ये जलप्रलय झाला. पूरग्रस्तांना मदत करण्याच्या कामी त्यांनी केलेली कामगिरी अविस्मरणीय आहे. १९२८ च्या फेब्रुवरीत बार्डोलीला करबंदीची चळवळ जोरात सुरू झाली.

 Copyright © 2020 Authors

ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-6 No. 16 June 2020

त्या लढ्याची संपूर्ण योजना वल्लभभाईंची होती. फेब्रुवारी १९२८ ते ऑक्टोबर १९२८ पर्यंत हा लढा चालू होता. त्यात त्यांनी घवघवीत यश मिळविले. त्यांचे नाव सर्व भारतभर दुमदुमू लागले व याच वेळी सरदार ही उपाधी त्यांना प्राप्त झाली. १९३० साली मिठाच्या सत्याग्रहात त्यांनी भाषणबंदीचा हुकूम मोडला आणि रास गावी भाषण केले. त्यामुळे त्यांना सिक्षा व तुरुंगवास भोगावा लागला. यानंतर त्यांना ३ महिने, ९ महिने असा आणखी शिक्षा झाल्या. सरदारांचे कर्तृत्व व काँग्रेसमधील कार्य यांचा विचार करून त्यांना कराची काँग्रेसचे अध्यक्षस्थान देण्यात आले. गांधींबरोबरच त्यांनाही १९३२ मध्ये अटक झाली व येरवड्यास स्थानबद्ध करण्यात आले. त्यांना जुले १९३४ मध्ये सोडण्यात आले. पुढे बिहारच्या भूकंपाच्या वेळी काँग्रेसचे विधिमंडळ प्रवेशविषयक धोरण बदलले. त्या साली पार्लमेंटरी बोर्ड स्थापन झाले आणि सरदार त्याच्या उपसमितीचे अध्यक्ष झाले. १९३६ साली पुन्हा त्यांना प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणूक मंडळाचे अध्यक्ष केले. सरदारांची ती कामगिरी अत्यंत मोलाची होती. १९३८ च्या हरिपूर काँग्रेसचे ते स्वागताध्यक्ष आणि सुभाषबाबू अध्यक्ष होते. त्याच साली राजकोटच्या महाराजांवरोवर संस्थानी प्रजेतर्फे त्यांनी तडजोड केलीय पण महाराजांनी ती तडजोड अमान्य केली. सरदारांनी कायदेभंग सुरू केला. त्याच कारणाने गांधींना ३ ते ७ मार्च १९३९ दरम्यान उपवास करावा लागला. १९४० च्या नोव्हेंबरमध्ये वैयक्तिक सत्याग्रहात त्यांना स्थानबद्द करण्यात आले. ८ ऑगस्ट १९४२ रोजी 'छोडो भारत' चा ठराव संमत होण्यापूर्वीच सरदारांनी गुजरात पटेवला होता. ९ ऑगस्टला त्यांना अहमदनगरच्या किल्ल्यात इतर काँग्रेसच्या नेत्यांबोबर अटकेत ठेवले. १५ जून १९४५ रोजी त्यांची सुटका झाली. सुटकेनंतर सिमला परिषद, कॅबिनेट मिशन वगैरेंत त्यांनी भाग घेतला. त्यांच्या मध्यस्थीने मुंबईच्या नाविक बंडाला (१९४६) आळा घातला गेला. २ सप्टेंबर १९४६ रोजी हंगामी मंत्रिमंडळात गृहमंत्री म्हणून ते समाविष्ट झाले. घटनापरिषदेचे ते सभासद होतेच. त्यांनी सुरुवातीस कम्युनिस्टांची बंडे निपटून काढलीय पण सरदारांचे सर्वांत मोठे, महत्त्वाचे व राष्ट्रीय ऐक्याचे काम म्हणजे संस्थानांच्या वलीनीकरणा चे काम होय. त्यांनी हैदराबाद, जुनागठ व काश्मीर सोडून इतर सु. ५५० संस्थाने भारतात विलीन केली. पुढे त्यांनी हैदराबाद संस्थानही, पोलीस कारवाई करून खालसा केले. या विलीनीकरणाच्या कार्यात त्यांना व्ही. पी. मेनन यांचे बहुमोल साहाय्य झाले. प्रसिद्ध सोरटी सोमनाथ मंदिराच्या पुनरुज्जीवनासाठी व व्यवस्थेसाठी त्यांनी एक विश्वस्त निधी उभा केला. अस्पृश्यांना त्या देवळात प्रवेश व पूजा करण्याचा हक्क विश्वस्त पत्रकात वल्लभभाईंनी नमूद केलाय तसेच सर्व धर्माच्या व्यक्तींना खुल्या प्रवेशाची तरतुदही त्यात नमूद केली. ही त्यांची इच्छा पुढे १९५१ मध्ये पुरी झाली.

**कार्याचे मूल्यमापन –**

महात्मा गांधीचा ३० जानेवरी १९४८ रोजी खून झाला. आपण गृहमंत्री असताना ही घटना घडावी, यामुळे ते अत्यंत उद्विग्न झाले. यानंतर काही दिवसांनी त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर त्यांची प्रकृती हळूहळू खालावत गेली. ३१ ऑक्टेबर १९४८ रोजी मुंबईत त्यांचा सत्कार करण्यात आला.

सरदार वल्लभभाई पटेल म्हणजे भारत एकीकरणाचे जणक व भारताचे बिस्मार्क असलेले आढळते. आयुष्यभर केवळ देशहिताचा विचार केला. त्यांची प्रत्येक कृती म्हणजे भारतासाठी केलेल्या त्यागाची प्रचीती होय म्हणून सरदार वल्लभभाई पटेल हे इतिहासाच्या दृष्टीकोनातून दुर्लक्षित राहिलेले व्यक्तिमत्त्व होय त्यामळे त्यांचा नव्याने अभ्यास होणे अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथसूची –**

१. दै. लोकसत्ता, दि. २३ ऑक्टोबर, २०१५.


Copyright ⓒ 2020 Authors

२. Dr. Ravindra Kumar, Life and work of Sardar vallabhabhai Patel, Antlantic Paublication, New Delhi,1991.

३. Balraj Krushna, "Indias Bismark", Indus Sourse, Books, 2007-
४. Shivaram krushnrav Kshirsagar, "The Indomitable and the Triumph Borasad", Sardar Patel University, vallbhanagar, 1973-
५. Virendar Patel (Ed) Saradar Patel Deep & Deep Publication] New Delhi, 1993-
६. V- P- Menan, The Transfer of Power of India] Oriental Longman Publication, Haydrabad, 1997-
७- http://www]britannica-com/biography/Vallabhabhai&Ptel
८- P- N- Chopra (Chief Editor), The Iron Man of India, The Collected works of Sardar Vallabhabhai Patel, (Vol- XIII), 1991-
९. सरदार पटेल, भारत विभाजन, प्रभात प्रकाशन, २०१६.
१०. डॉ. प्रभा चोपडा, सरदार पटेल भारत विभाजन, (हिंदी संस्करण)प्रभात प्रकाशन, दिल्ली, प्रकाशन वर्ष अनुपलब्ध.
११.http://www.kuchewar.com/vallabhbhaipatel/bookswritten bysardarvallabhbhaipatel,php

 **Copyright © 2020 Authors**